पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. ३० दिनांक ०१/०५/२०२३

# मा.ना.श्री. रविंद्र चव्हाण, पालकमंत्री, पालघर जिल्हा यांच्या शुभहस्ते पोलीस अधीक्षक कार्यालय येथे १. सायबर पोलीस ठाणे, २. वायरलेस टॉवर, ३. थर्ड आय प्रणाली उद्‌घाटन सोहळा संपन्न

दिनांक ०१/०५/२०२३ रोजी महाराष्ट्र दिनाचे ६३ वे वर्धापन दिनाचे औचीत्य साधुन पालघर पोलीस अधीक्षक कार्यालय येथे मा. ना. श्री. रविंद्र चव्हाण, मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण तथा पालकमंत्री पालघर जिल्हा यांच्या शुभहस्ते १. सायबर पोलीस ठाणे २. वायरलेस टॉवर ३. थर्ड आय प्रणाली यांचे उद्‌घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

**१) सायबर पोलीस ठाणे :** संपुर्ण भारतात तसेच महाराष्ट्रात सायबर क्राईमचे गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. फेसबुकवरुन मैत्री करुन फसवणूक करणे, नोकरी देण्याच्या बहाण्याने आर्थीक फसवणूक करणे, इनकम टॅक्स भरणे किंवा लाईट बील भरणे बाकी असल्याचे सांगून लिंक पाठवून फसवणूक करणे, एटीएम कार्डची माहिती विचारुन फसवणूक करणे, तसेच इतर प्रकारच्या सायबर गुन्ह्यांना आळा घालणेकरीता व सायबर गुन्ह्यांचा जलद गतीने तपास करण्याकरीता शासनाच्या आदेशान्वये पालघर पोलीस दलाकरीता पोलीस अधीक्षक कार्यालय येथे स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे निर्माण करण्यात आले.

**२) वायरलेस टॉवर :** दि.०१ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होवून नवीन पालघर जिल्हा निर्माण करण्यात आला. पालघर जिल्हा पोलीस दलाचे कार्यक्षेत्रात ७ तालूक्याअंतर्गत ८१४ गावे व २९७४ पाडे आहेत. पालघर जिल्हा हा सागरी व डोंगरी भागाने व्यापलेला आहे. वादळवारा व पाऊस मोठ्या प्रमाणात झाल्यास आपत्तीच्या काळात सर्व दळणवळण यंत्रणा बंद पडू शकतात. अशा आपत्ती व्यवस्थापनवेळी शास्वत पर्याय म्हणून चांगली दळणवळण यंत्रणा असणे आवश्यक आहे. याकरीता पालघर जिल्ह्यात एकूण तीन ठिकाणी वायरलेस टॉवर उभारण्यात आले. i) महालक्ष्मी डोंगर ii) मोखाडा येथील सुर्यमाळ iii) पोलीस अधीक्षक कार्यालय.

पोलीस अधीक्षक कार्यालय येथील टॉवर टाटा कंपनीच्या सीएसआर फंडातून उभारण्यात आला असून इतर दोन ठिकाणचे टॉवर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीकडून प्राप्त झालेल्या १९ लाख रुपये निधीतून उभारण्यात आले आहे. सदर उभारण्यात आलेल्या टॉवरच्या माध्यमातून सर्व पोलीस ठाणे ते नियंत्रण कक्ष त्याचप्रमाणे जिल्ह्यातील कानाकोपऱ्यात फिरणारी सर्व वाहने १०० टक्के क्षमतेने या दळणवळण कार्यपध्दतीचा वापर करणार आहेत.

Scanned with CamScanner

**३) थर्ड आय प्रणाली :** पालघर जिल्हा पोलीस दलात आधुनिक तंत्रज्ञानाचा दैनंदिन कामकाजात वापर करावा याकरीता श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांच्या संकल्पनेतून थर्ड आय ॲप्लीकेशन कार्यान्वीत करण्यात आली आहे. मनुष्यबळाचा सुयोग्य वापर, कमीतकमी पेपर वर्क, स्मार्ट पेट्रोलींग, गुन्हे विश्लेषन हे सोप्या पध्दतीने होणार आहे. पेट्रोलींग करताना पोलीस विभागातील सर्व प्रकारची कर्तव्य अत्यंत प्रभावीपणे राबवणे सहज शक्य होणार असून गुन्हेगारी नियंत्रणासाठी त्याचा प्रभावी वापर होणार आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील महत्त्वाच्या ठिकाणी क्यु-आर कोड बसवण्यात येणार आहे त्यामुळे सदर ठिकाणी प्रभावी पोलीस गस्त होणार आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय येथील १. सायबर पोलीस ठाणे २. वायरलेस टॉवर ३. थर्ड आय प्रणाली यांचे उद्घाटन मा. ना. श्री. रविंद्र चव्हाण, मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण तथा पालकमंत्री पालघर जिल्हा यांचे शुभहस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे वेळी मा. श्री. प्रकाश निकम, अध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर, मा. श्री. राजेंद्र गावीत, लोकसभा सदस्य पालघर, मा. ॲड. श्री. निरंजन डावखरे, विधान परीषद सदस्य, मा. श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, विधान परीषद सदस्य, मा. श्री. हितेंद्र ठाकूर, विधानसभा सदस्य, मा. श्री. क्षितीज ठाकूर, विधानसभा सदस्य, मा. श्री. शांताराम मोरे, विधानसभा सदस्य, मा. श्री. दौलत दरोडा, विधानसभा सदस्य, मा. श्री. विनोद निकोले, विधानसभा सदस्य, मा. श्री. सुनिल भुसारा, विधानसभा सदस्य, मा. श्री. श्रीनिवास वनगा, विधानसभा सदस्य, मा. श्री. राजेश पाटील, विधानसभा सदस्य, मा. श्री. गोविंद बोडके, जिल्हाधिकारी पालघर, मा. श्री. भानुदास पालवे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर, श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांचे उपस्थितीत पार पडला.

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner